# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः09.04.2024 वारःमंगळवार

---

1.लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या 8 जागांसाठी 204 उमेदवार रिंगणात

2.चंद्रपूरमधील प्रचारसभेत पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांचं विरोधकांवर टीकास्त्र

3.पुणे जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघातील मतदारसंख्येत गेल्या अडीच महिन्यात दीड लाखांपेक्षा जास्त वाढ

आणि

4.राज्यात आज गुढी पाडव्याचा उत्साह; नववर्ष स्वागतासाठी विविध उपक्रमांचं आयोजन

**उमेदवारी अर्ज**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या अखेरच्या दिवशी राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघांतील एकंदर ९५ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. त्यामुळे आता २०४ उमेदवार रिंगणात आहे. अमरावतीमध्ये ३७, परभणीत ३४, हिंगोलीत ३३, वर्ध्यात २४, नांदेडमधे २३, बुलडाण्यात २१, यवतमाळ-वाशिममध्ये १७ आणि अकोल्यात १५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

यवतमाळ वाशिम मतदारसंघातील 3 उमेदवारांनी काल अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता 17 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

नांदेड लोकसभा मतदारसंघात ४२ उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे २३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

अकोला मतदार संघातून भाजपाचे माजी आमदार नारायण गव्हाणकर यांनी माघार घेतल्यानं भाजपा उमेदवार अनुप धोत्रे यांना दिलासा मिळाला आहे.

हिंगोली मतदारसंघात शिवसेनेचा उमेदवार घोषित झाल्याने नाराज झालेल्या तीन पदाधिकाऱ्यांनी बंडाचं निशाण फडकावत अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला होता. त्यात भाजपाचे रामदास पाटील, शाम भारती महाराज यांचा समावेश होता. मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, आमदार श्रीकांत भारतीय यांच्या शिष्टमंडळानं या बंडखोरांची भेट घेतल्यानंतर दोघांनी काल अर्ज मागे घेतले. भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शिवाजी जाधव यांनी मात्र अर्ज कायम ठेवला आहे.

दुसऱ्या टप्प्यात येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे. या ८ लोकसभा मतदारसंघात १ कोटी ४९ लाख २५ हजार ९१२ मतदार आहेत. आणि १६ हजार ५८९ मतदान केंद्र आहेत.

**पंतप्रधान**

दिशाहीन विरोधकांकडे, देशाच्या विकासासाठी कोणतीही दृष्टी नाही, अशी टीका पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी काल चंद्रपूरमध्ये केली. महायुतीचे चंद्रपूरचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार तसंच गडचिरोली चिमूर मतदार संघाचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. विरोधक कायम विकासकामात अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात; असं सांगून ते म्हणाले की रालोआ सरकारच्या काळात महाराष्ट्रातच नाही तर देशाच्या इतर भागातही नक्षलवाद कमी झाला असून विकासाला चालना मिळाली आहे.

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टी महायुतीच्या उमेदवारांना जनता निवडून देईल, असा विश्वासही मोदींनी यावेळी व्यक्त केला. आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून करत त्यांनी मराठीतूनच जनतेला गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, यांच्यासह महायुतीतील विविध पक्षांचे नेते, आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

यानंतर उद्या पंतप्रधान रामटेक लोकसभा मतदारसंघात कन्हान इथं प्रचारसभा घेणार आहेत.

**<u>योगी</u>**

उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते योगी आदित्यनाथ यांनी काल वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट इथं प्रचार सभा घेतली. वर्धा लोकसभा मतदारसंघात रामदास तडस हे महायुतीचे उमेदवार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश सर्व क्षेत्रात विकास साधत आहे, नेता, नीती आणि नियत असलेला पक्षच परिवर्तन घडवून आणू शकतो असं, योगी आदित्यनाथ म्हणाले.

**<u>वर्षा</u>**

मुख्यमंत्र्यांचं शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर राजकीय बैठका होत असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे दाखल झाली होती. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी काल दिली. या नोटीशीचं उत्तर मिळाल्यानंतर पुढची कारवाई होईल.

मुंबई शहराच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ही नोटीस बजावल्याचं त्यांनी सांगितलं.  याशिवाय मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह अधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांचा उपयोग राजकीय कारणासाठी होणार नाही याची खबरदारी घेण्याचं पत्रही निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना लिहिलं असल्याचं चोकलिंगम म्हणाले.

**<u>काँग्रेस</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर केलेल्या टिपण्णीबद्दल काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार नोंदवली आहे. ज्येष्ठ नेते सलमान खुर्शीद यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं याबाबत नवी दिल्लीत आयोगाची भेट घेतली. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लीम लीगचा ठसा आहे या पंतप्रधान मोदी यांच्या विधानावर पक्षाने आक्षेप घेतला असून ही बाब गांभीर्यानं घेऊन कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

**<u>निवडणूक चिन्ह</u>**

अकोला मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रकाश आंबेडकर यांना प्रेशर कुकर हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे. तर परभणीत राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांना शिट्टी हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे.

**पुणे जिल्हाधिकारी**

पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदार संघात मिळून गेल्या सुमारे अडीच महिन्यांच्या कालावधीत १ लाख ६५ हजार ९३२ मतदारांची वाढ झाली असल्याची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. वाढीव मतदारांमध्ये ८४ हजार ६४० पुरुष मतदार आणि ८१ हजार २५९ महिला मतदारांचा समावेश आहे. याशिवाय ३३ तृतीयपंथी मतदार देखील वाढले आहेत. यापूर्वी २३ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीनुसार जिल्ह्यात एकंदर ८१ लाख २७ हजार १९ मतदार होते तर काल जाहीर झालेल्या मतदार यादीनुसार मतदारांची ही संख्या ८२ लाख ९२ हजार ९५१ पर्यंत वाढली आहे. मतदानाच्या तारखेच्या आधी एक महिन्यापर्यंत मतदार यादीत नव्यानं नावनोंदणी करता येते त्यामुळं आगामी काही दिवस जिल्ह्यात नवीन मतदार नोंदणी सुरु राहणार आहे. वाढीव मतदार संख्या लक्षात घेऊन त्यानुसार मतदान केंद्रांमध्ये देखील वाढ करण्यात आल्याचं दिवसे यांनी सांगितलं. शहरातील काही प्रमुख गृहनिर्माण सोसायट्यांमधून मतदान केंद्र उपलब्ध करून दिली असून मतदानाची टक्केवारी वाढावण्यासाठी प्रशासनाकडून अनेक प्रयत्न सुरू आहेत; असं ते म्हणाले.

दरम्यान, मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या शहरांतील महापालिका आयुक्त आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक; देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीत घेतली होती. यात शहरांमधील मतदानाची टक्केवारी किमान ६० ते ६५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याच्या दृष्टीनं उपाय योजना सुचवण्यात आल्या. मतदान प्रक्रियेशी संबंधित मतदारांच्या समस्या सोडवाव्यात, समाज माध्यमांद्वारे मतदान जागृतीवर भर द्यावा, उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेऊन मतदारांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सुविधा मतदान केंद्रांवर उपलब्ध करून द्याव्यात असे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

**गुढीपाडवा**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा या सणाचा आज राज्यात सर्वत्र उत्साह आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक उत्तम मुहूर्त मानल्या जाणाऱ्या गुढी पाडव्याच्या दिवशी नवीन संवत्सर सुरू होते. घरोघरी गुढ्या उभारून, तोरणे लावून नवीन वर्षाचं स्वागत केलं जातं. अनेकजण गुढी पाडव्याला नवीन उद्योग, व्यवसायाची सुरुवात करतात. राज्यपाल रमेश बैस यांनी गुढीपाडवा आणि मराठी नूतन वर्षानिमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यात ठीकठिकाणी आज नववर्ष स्वागतानिमित्त सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. गुढी पाडव्याच्या पार्श्वभूमीवर सर्वच बाजारपेठामध्ये उत्साहाचं वातावरण आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात काल रत्नागिरी, रायगड या भागातून नऊ हजार पेट्या आंब्याची आवक झाली.

**संभाजी महाराज**

छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त काल पुणे जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र वढू इथं हजारो नागरिकांनी त्यांना आदरांजली अर्पण केली. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषानं वढू इथला समाधी परिसर दुमदुमला होता. धाराशिवमध्ये शिवप्रतिष्ठानच्या वतीने काल छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यानिमित्त राज्यात ठीकठिकाणी विविध सामाजिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**करवीर निवासिनी**

कोल्हापूरच्या करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात वासंतिक नवरात्रोत्सवाचं औचित्य साधून शक्ती महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. नवी दिल्लीची संगीत नाटक अकादमी आणि कोल्हापूर जिल्हा प्रशासनानं हा महोत्सव आयोजित केला आहे. याचं उद्घाटन उद्या संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा यांच्या हस्ते होणार आहे.

**बाजार समिती**

नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचं लेव्ही प्रकरण न्यायप्रविष्ट आहे; त्यामुळे न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत लिलाव सुरू करावेत असे आदेश जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी काल व्यापाऱ्यांना दिले. मात्र, व्यापारी आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे नाशिक जिल्ह्यातील बाजार समितीमधले लिलाव यापुढेही काही दिवस बंदच राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, शेतकरी संघटनांनी याप्रकरणी पुढाकार घेतला आहे; शेतकरी संघटना उद्यापासून शेतमालाचा लिलाव करतील असं संघटनांनी म्हटलं आहे. माथाडी कामगारांना लेव्ही देण्यास व्यापारी वर्गाचा विरोध असून यासंदर्भात व्यापाऱ्यांना नोटीस आल्यानंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

**<u>महावितरण</u>**

राज्यातील महावितरणच्या विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन्सला आता सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे वीजपुरवठा केला जाणार आहे. यासाठी चार्जिंग स्टेशन्सच्या परिसरातच सौर प्रकल्प उभारून हरित ऊर्जेची निर्मिती केली जाणार आहे. अशा प्रकारचा पहिला प्रकल्प पुण्यात साकारत आहे. गणेशखिंड इथल्या प्रकाशभवन इमारतीच्या छतावर ६० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचं काम सुरू करण्यात आलं असून या प्रकल्पातून दरमहा निर्माण होणाऱ्या सुमारे ७ हजार २०० युनिट विजेचा पुरवठा परिसरातील विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनला करण्यात येईल.

**<u>मजूर ठार</u>**

नाशिकमध्ये गंगापूर रस्त्यावर सुरू असलेल्या एका बांधकामाच्या ठिकाणी भिंत कोसळून दोन मजूरांचा मृत्यू झाला. तळमजल्यासाठी बांधण्यात आलेली भिंत कोसळल्याने चार मजूर दबले गेले. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला; अन्य दोघांवर उपचार सुरू आहेत.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडयामध्ये तुरळक ठिकाणी, तर विदर्भात काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.